# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

---

जा.क्र.मऔविम/भूविभाग/कार्या. / D86473 दिनांक : 27/11/2019

## परिपत्रक

विषय : सूक्ष्म व लघु उद्योजकांना गाळे बांधण्यास परवानगी दिल्यानंतर त्यामधील २० टक्के सहाय्यभूत सेवा अंतर्गत बांधलेल्या गाळयांचे हस्तांतराकरीता/ रुपांतराकरीता व्यापारी दराऐवजी औद्योगिक दर आकारणी करणेबाबत..

संदर्भ : क्र.मऔविम/विधी व कामकाज/१५६/२०१२, दि. ०३.०७.२०१२

महामंडळाच्या दि. ०३.०७.२०१२ च्या परिपत्रकान्वये सुक्ष्म व लघु उद्योजकांना गाळे उपलब्ध करुन देण्याबाबतचे धोरण निर्गमित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार विकास नियंत्रण नियमावलीनुसार संबंधीत औद्योगिक क्षेत्रातील, सहाय्यभुत सेवांकरीता अनुज्ञेय असलेल्या एकूण २० टक्के मर्यादेच्या अधिन राहून सुक्ष्म व लघु उद्योजकांसाठी भूखंडावर एकूण बांधावयाच्या क्षेत्रापैकी कमाल २० टक्के क्षेत्र सहाय्यभूत सेवांकरीता (निवासी, शैक्षणिक वापर वगळून) वापरता येईल व विकास नियंत्रण नियमावलीनुसार वाणिज्य प्रयोजन अनुज्ञेय राहिल. वाणिज्य वापरास्तव नियमाप्रमाणे अतिरिक्त शुल्क महामंडळास अदा करावे लागेल तसेच, औद्योगिक भूखंडाचे व्यापारी भूखंडात रुपांतर करण्यासंदर्भातील तरतुदी लागू राहतील, अशी अट आहे. तथापि, मा. संचालक मंडळाच्या दि. २३.०८.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५९७४ चे अनुषंगाने दि. ०३.०७.२०१२ च्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे-

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत धोरण-२०१५ च्या धर्तीवर औद्योगिक विकासाच्या हेतूने तसेच रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देणेकरीता सूक्ष्म व लघु उद्योजकांना गाळे/Flatted Gala बांधण्यास परवानगी दिल्यानंतर त्यामधील २० टक्के सहाय्यभूत सेवा अंतर्गत गाळयांचे व्यापारी प्रयोजनार्थ रुपांतरणाकरीता प्रचलित व्यापारी दराऐवजी प्रचलित औद्योगिक दर आकारण्यात यावा.

उक्त परिपत्रकातील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याची सबंधीतांनी नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीने निर्गमित करण्यात येत आहे.

(अविनाश सुभेदार)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम./सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
५. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
६. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
८. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२)/जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१०. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
११. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई